प-२८

# बृहन्मुंबई महानगरपालिका

परिपत्रक

२०२५-२६

क्र.उपायुक्त/वित्त/ ०१  दि.२० .१०.२०२५

**विषय** : मान. खासदार / मान. आमदार यांनी नागरिकांच्या पायाभूत सुविधा व विकास कामे पार पाडण्याकरिता पत्रांद्वारे मागणी केलेल्या निधींच्या अनुषंगाने विभाग पातळीवर करावयाच्या कामांबाबत

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील लोकनियुक्त प्रतिनिधींचा कार्यकाळ दि.०७.०३.२०२२ रोजी संपल्यानंतर महानगरपालिकेवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे मान. खासदार / मान. आमदार त्यांच्यांशी संबंधित विभागातील विकास कामे तसेच पायाभूत सुविधा संबंधिची कामे करण्यासाठी पत्रांद्वारे मोठ्या प्रमाणात मागणी करत आहेत. त्याअनुषंगाने मान. खासदार / मान. आमदार त्यांच्यांशी संबंधित विभागातील विकास कामे तसेच पायाभूत सुविधा संबंधिची कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंबंधी प्राप्त होणाऱ्या पत्रांसंबंधात कार्यवाही करण्याच्या धोरण व प्रणालीस प्रशासक (स्थायी समिती) यांची स्थायी समिती ठराव क्र.१८७० दि.१६.०२.२०२३ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

विभाग पातळीवर करण्यात येणारी कामे सर्वसाधारणपणे दरपत्रिका / अनस्टार निविदा (रू.२५ लाखापर्यंतच्या मर्यादेत) मागवून पार पाडण्यात येतात. तथापि, प्रशासक (स्थायी समिती) यांच्या उपरोक्त मंजुरीच्या अनुषंगाने मान. खासदार / मान. आमदार यांच्या क्षेत्रात विभाग पातळीवर निधी उपलब्ध करून देण्यात येत असून सदर निधीमधून विभाग पातळीवर करावयाच्या विविध कामांच्या एकत्रित अंदाजपत्रकानुसार सदर कामे उपलब्ध कालावधीमध्ये पूर्ण होण्याकरिता तसेच कामांचा उत्तम दर्जा राखण्याच्या दृष्टिने मोठया रक्कमेच्या एकत्रित निविदा मागविण्याबाबत मा. आमदार यांच्याकडून मागणी होत असून त्यानुसार मार्गदर्शक तत्वे जारी करण्याच्या अनुषंगाने खालील निर्देश देण्यात येत आहेत.

Scanned with CamScanner

आगामी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या येऊ घातलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक – २०२५ च्या अनुषंगाने मान. खासदार / मान. आमदार यांच्या क्षेत्रात विभाग पातळीवर निधी उपलब्ध करून देण्यात येत असून सदर निधीमधून विभागातील विकास कामे तसेच पायाभूत सुविधा संबंधिची कामे त्वरीत पार पाडणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता विभागांकरिता मंजूर होत असलेल्या निधींच्या अनुषंगाने विभागीय सहाय्यक आयुक्त यांनी परिपत्रक क्र. प्रले/वित्त/एफआरडी-१/५ दि.१०.०५.२०१६ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार तसेच स्थायी समिती ठराव क्र.१८७० दि.१६.०२.२०२३ अन्वये मंजुर धोरण व प्रणालीनुसार विभाग पातळीवर करावयाच्या विविध कामांच्या एकत्रित अंदाजपत्रकानुसार मोठया रक्कमेच्या निविदा संबंधित अतिरिक्त आयुक्त यांच्या प्रशासकिय मान्यतेने मागवून कामे पार पाडावीत.

सदर कार्यपध्दती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या येऊ घातलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक – २०२५ ची आचारसंहिता जाहीर होईपर्यंतच लागू असेल.

15/10/25

उप आयुक्त (वित्त)

15/10/25

अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

15/10

महानगरपालिका आयुक्त

Scanned with CamScanner